# ECHO OF HIS CALL

# बोलाविण्याचा प्रतिध्वनी

**MARATHI**

*India's National Spiritual Newspaper*

₹ 10/-

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAANS

**Editor : S. SAM SELVA RAJ** | **16 Languages** | **Associate Editor : Rev. Shashi Tiwari**

VOL: XXII | YEAR OF OUR LORD JESUS CHRIST, DECEMBER 2020 | NO. 12

**पवित्र शास्त्र**

कृपया हा शास्त्रभाग पाठ करा

**प्रभुची स्तुती असो**

**यशया ९:१-७**

१) तथापि आता ज्या भूमीत विपन्ति आहे तेथे हा अंधकार राहणार नाही. त्याने मागील काळी जबुलून प्रांत व नफताली प्रांत यांची अप्रतिष्ठा केली.तरी पुढील काळी समुद्रतीरींचा प्रदेश योर्देनेच्या पलीकडील प्रांत विदेशी लोकांचे मंडळ (गालील) यांची तो प्रतिष्ठा करील.

२)अंधकरांत चालणाऱ्या लोकांनी मोठा प्रकाश पाहिला आहे. मृत्युच्छयाच्या प्रदेशात बसणाऱ्यांवर प्रकाश पडला आहे.

३) तूं राष्ट्रांची वृध्दि केली आहे. त्याला महानद प्राप्ति करून दिली आहे. हंगामाच्या उत्सवसमयी करावयाच्या आनंदाप्रमाणे ते तुजसमोर आनंद करीतात.

४) कारण मिद्यानाच्या दिवसाप्रमाणे, तूं त्याच्या भाराचें जूं त्याच्या खांद्यावरची काठी, त्याजवर जुलूम करणाऱ्याचा सोटा मोडिला आहे.

५) युध्दाच्या गर्दीत जोडे घातलेल्या योध्यांचे जोडे व रक्ताने भरलेली वस्त्रे ही जाळण्यासाठी अग्नीला अर्पण झाली आहेत.

६) कारण आम्हांसाठी बाळ जन्माला आहे, आम्हांस पुत्र दिला आहे. त्याच्या खांद्यावर सत्ता राहील. त्याला अभ्दुत मंत्री समर्थ देव, सनातन पिता, शांतीचा अधिपति म्हणतील.

७) त्यांच्या सत्तावृध्दिला व शांतीला अंत नसणार. तो दाविदाच्या सिंहासनावर बसून त्यांचे सम्राज्यचालविल आणि तेथुन पुढे ते सर्वकाळ न्यायाने व धर्माने दृढव स्थिर करील. सेनाधीश परमेश्वरांचा आवेश हे सिध्द नेईल.

## Revelation of God!

# देवाचे प्रकटीकरण

**(पास्टर एस्.सॅम. सेल्वाराज)**

परमेश्वराने शिलोत पुन: दर्शन दिले म्हणजे परमेश्वर आपल्या वचनाच्या द्वारे शमुवेलास प्रगट झाल. शमुवेलाची ही हकीकत सर्व इस्त्रासलांत पसरली. (१ शमुवेल ३:२१, ४:१)

एली याजकाच्या काळात परमेश्वराचे वचन दुर्लभ झाले होते. तो शिले ह येथे मंदिरात सेवा करीत होता. आणि छोटा शमुवेल त्याचा सहाय्यक होता. शमुवेल छोटा मुलगा असतानाच परमेश्वर त्याजशी बोलला. परमेश्वराने त्याला हाक मारिली. शमुवेला! शमुवेला!! आणि एलीने त्याला सुचविल्या प्रमाणे तिसऱ्या वेळेस शमुवेलाने उत्तर दिले. तो बोलला. "बोल तुझा दास ऐकत आहे." (१ शमुवेल ३:१०) परमेश्वराने शमुवेलास म्हटले, "मी एलीच्या घराण्याविषयी अशी शपथ केली आहे की एलीच्या घराण्याच्या पालकाचे क्षालन यज्ञ व अर्पण यांनी कदापि व्हावयाचे नाही. देवाने त्याला सांगितले ते सर्व काही शमुवेलाने एलीस सांगितले. त्यावर एलीने म्हटले, "परमेश्वरच तो त्याला जसे बरे वाटेल तसे तो करो." (१ शमुवेल ३:१८)

आपल्या भयावह देवाने मोशेला एका झुडपांतुन अग्निज्वालेच्या द्वारे दर्शन दिले. (निर्गम ३:१-२) पुनरूत्थित ख्रिस्ताने मारीया मग्दालीनेला दर्शन देऊन म्हटले, "बाई का रडलेस ती त्याला

*(पान ३ वर .....)*

## A Loving Request

As you all know we are hard-pressed to meet several needs like the salary of the staff, expenses on the purchase of paper and also the travel expenses. Generally we never ask others to meet our financial needs. But we request those who truly love this ministry to send your offerings through Money Orders, Cheque or Demand Draft, Phone Pay, NEFT or through any other methods and support us in this Ministry. The Lord will surely bless you. For details call: +91 98412 71858

**- Editor, Echo of His Call**

# आमचे कार्याविषयीचे धोरण

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.

मासिक प्रकाशन - इंग्रजी,तमीळ,मल्यालम,तेलगु,हिन्दी,मराठी,कन्नड,बंगाली,गुजराती,उरीया,नेपाली,आसामी,पंजाबी,उर्दु सिंहाला आणि अफ्रिकन

ECHO OF HIS CALL
1969-2019
GOLDEN JUBILEE




**CHIEF EDITORS**
Pastor S. Sam Selva Raj
Angeline Selvakumari Henry, M.A., M.Ed.
**MANAGING EDITOR**
Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.
**ADMINISTRATION**
Bro. N. Prakasam, M.A., General Manager
**EDITORIAL BOARD**
Sis. Jesy Veena Sam
Bro. M. Paulraj, M.A., B.Ed.
Sis. Serena Bevin, M.A., M. Phil., B.Ed.
**Head Qrs. CO-ORDINATORS**
Bro. John Rodrigues
Sis. E. Daisy Rani
**ADVISORY BOARD**
Adv. Jose Abraham
Adv. N. Balaji, B.Com., B.L.
Dr. S. Rabinder Boaz, M.S.
Er. C.G.S. Baburao, B.Tech., M.Tech. (DM)
Aud. K. Puratchivendan, M.Com., B.L.
Bro. Rajeswaran Samuel, B.Com.

**PUBLISHER & PRINTER**
Pastor S. SAM SELVA RAJ
**Echo of His Call Printers**
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.
**Phone :** (+91-44) 2852 8282
2852 9293, 2854 7766
**Email :** sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in
**Websites :**
www.echoofhiscall.org
www.echoofhiscall.com



**मी त्यांचा शोक पालटून तेथे आनंद करीन, मी त्यांचे सांत्वन करीन, त्यांच्या दु:खानंतर त्यांनी आनंद करावा असे मी करीन"(यिर्मया ३१:१३)**

ख्रिस्तामधील अती प्रिय बंधू आणि बहिणींनो,

आम्ही आपल्या प्रभु आणि तारणाऱ्या येशू ख्रिस्तांच्या अति श्रेष्ठ नामात शुभेच्छा देत आहोत. येशू ख्रिस्त हे नाव सर्व नावांहून श्रेष्ठ आहे. आम्ही केवळ आणि केवळ त्यालाच महिमा आणि गौरव देतो.

होय, ही महान अशी गोष्ट आहे की, प्रभु येशू ख्रिस्ताने त्याच्या कृपेने त्यांच्या नैतृत्वात या वर्षाच्या शेवट पर्यंत आपणांस आणले आहे. वर्षाच्या सुरूवातीस आपणा सर्वांना वाटले होते की हे वर्ष जगभरातील मानव जातीला अंत्यत आशीर्वादाचे जाईल. परंतु आज अनेक नकारात्मक, किंवा विरूध्द अशा गोष्टी घडत आहेत.

या मागे काहीतरी कारण असलेच पाहिजे. आज घडत असलेल्या गोष्टि देवाला माहित असल्याशिवाय घडत नाहीत. कोवीड १९ या महामारीने संपुर्ण जगभरात हाहाकार माजविला आहे. आम्ही आमच्या अनेक मित्रांना गमावले आहे आणि त्याबद्दल आपण दु:खी आहोत.

आमोजाचा पुत्र यशमा याला यहुदा व यरूशलेम याविषयी यहुदाचे राजे, उज्जीया, योथाम्, आहाज व हिज्कीया यांच्या दिवसात प्राप्त झालेला दृष्टांत," हे आकाशा ऐक, अगे पृथ्वी कान दे कारण परमेश्वर बोलत आहे. "मी मुलांचे पालन पोषण केले, त्यांस लहानांचे मोठे केले तरी ती माझ्याशी फितुर झाली." बैल आपल्या धन्याला ओळखितो. गाढव आपल्या मालकाचा कोठिंबा ओळखितो, पण इस्त्राएल ओळखित नाही, माझे लोक विचार करीत नाहीत. किती हे पापिष्ट राष्ट्र! दृष्कर्मांने भारावलेले लोक, दुर्जनांची संतति! ही आचारभ्रष्टमुळे! यांनी परमेश्वराला सोडिले आहे. इस्त्राएलच्या पवित्र प्रभुस तुच्छ मानिले आहे. ती वियुक्त होऊन मागे फिरली आहेत."

तुम्ही अधिकाधिक फितुन मार का खात राहता? हर एक मस्तक व्यथित झाले आहे, हर एक हृदय म्लान झाले आहे. पायाच्या तळव्यापासुन मस्तकापर्यंत काहीच धड नाही. जखमा, चेंचरलेले व पुरळलेले पाय आहेत. ते कोणी पिळून काढीत नाही, त्यांवर कोणी पट्टी बांधीत नाही, कोणी तेलाने नरम करीत नाही. तुमचा देश ओसाड आहे. तुमची नगरे अग्नीने जळली आहेत. तुमची शेते परके लोक तुम्हां देखत खाऊन टाकीत आहेत. परक्यांनी उदध्वस्त केल्याप्रमाणे ती ओसाड झाली आहेत. सियोनाची कन्या द्राक्षीच्या मळ्यांतल्या खोपीसारखी, कांकड्यांच्या बागेतल्या माचाळासारखी वेढा पडलेल्या नगरासारखी राहिली आहे. सेनाधीक्ष परमेश्वराने आम्हासाठी यत्किचिंत शेष राखून ठेविले नसते तर आम्ही सदोमासारखे झालो असतो, गमोऱ्याप्रमाणे बनलो असतो.

सदोमाच्या अधिपतींनो, परमेश्वराचे वचन ऐका, गमोऱ्याच्या लोकांनो, आमच्या देवाच्या धर्मशास्त्राकडे कान द्या. परमेश्वर म्हणतो, तुमचे बहुत यज्ञबली माझ्या काय कामाचे? मेंढरांचे होम, पुष्ट वासरांची वपा यांनी माझी अति तृप्ति झाली आहे. बैल कोकरे यांच्या रक्ताने मला संतोष होत नाही. तुम्ही

**Our Ministries:** ECHO OF HIS CALL Monthly Magazines (16 languages) BIBLECOR - Postal Courses (3 languages) Theological Correspondence Courses (2 languages) Church Planting Nehemiah Bible Colleges Gospel Printing Press Great Commission Partners Village English High School Crusades 100 Prayer Warriors Community Development

माझे दर्शन घेण्यास येताना माझी अंगणे तुडविता, हे तुम्हास सांगितले कोणी? निरर्थक आणि आणखी आणू नका, धुपाचा मला वीट आहे. चंद्रदर्शन शब्बाथ व मिळे भरविणे मला खपत नाही. सणाचा मिळा हाहि अधर्मच होय. माझा जीव तुमची चंद्रदर्शने व सपा यांचा द्वेष करितो. त्यांचा मला भार झाला आहे. तो सोसुन मी थकलो आहे. तुम्ही हात पसरता तेव्हा मी तुमच्याकडे डोळे झाकितो, तुम्ही कितीही विनवण्याकेल्या तरी मी ऐकत नाही, तुमचे हात रक्ताने भरले आहेत.

**आपणांस धुवा, स्वच्छ करा, माझ्या डोळयांपासुन आपल्या कर्माचे दृष्टपण दुर करा, दृष्टपणा करण्याचे सोडून खा."**



Secretary

देव जे आपणांस करावयास सांगत ते करण्याशिवाय सुटकेकरिता दुसरा मार्ग नाही.

देव कृपेद्वारे आम्ही सेवेत पुढे-पुढे जात आहोत. महामरीच्या समयात मंडळीच्या सेवेव्यत्तिरिक्त आमच्या बहुतेक सेवा स्थगीत झाल्या. देवाने आम्हांस समर्पित आणि मिशन कार्याची माहिती असलेली सेक्रटरी आणि **सेंट पॉलस् मॅट्रोव्युलेशन स्कूल** करिता प्रिन्सिपल दिले आहेत. आम्हाला विश्वास आहे की, आमची शाळा सामाजातील गरीब लेकरांच्या आणि मिशनरीच्या व पाळकांच्या लेकराकरिता आशीर्वादचे कारण ठरण्यास पुढे पुढे वाचचाल करीत आहे. आमची इच्छा आहे की दारिद्र रेषेतील मुलांना उत्तम आणि दर्जेदार शिक्षण देऊन देशाकरिता उत्तम नागरिक, पुढारी, शास्त्रज्ञ, देवाला भिऊन वर्तन करणारे लोक तयार करावेत. इंग्रजीत शिक्षण देण्यावर आम्ही अधिक भर देत आहोत. आमच्या प्रयत्नांना यशस्वी होण्यासाठी तुमच्या प्रार्थनांची आणि पाठबळाची गरज आहे. आमच्या शाळेचे हे २४ वे वर्ष आहे.



Principal

आम्हांला याची जाणीव आहे की, देवाने एक मोठ्या उद्देशाने मनात ठेवून ही शाळा आमच्या हातात दिली आहे. तेव्हा चला आपण स्वत:स देवाच्या सामर्थी हातात सोपुन देऊ या. यासाठी की त्याने योग्य वेळी अपणांस उंच करावे.

काम अतिशय वाढल्यामुळे आम्हांला दैनंदिन कार्यालयीन कामकाज आणि सेवा वाढीबद्दल ज्या योजनांवर लक्ष देण्यास पुरेसा वेळ मिळत नाही. त्यामुळे आम्ही कार्यालयाकरिता समर्पित आणि मिशनकार्य केंद्रित विचार असणाऱ्या पुढील पुर्व वेळ स्टाफ शोधीत आहोत.

१) चीफ एक्झीकटीव्हसाठी इंग्रजीत महत्वाचे पक्षव्यवहार हाताळू शकणारे सचिव सेक्रटरी (पात्रता - पदवीधर इंग्रजी व इतर भाषेत स्वतंत्ररित्या पत्रव्यवहार करू शकणारा! शकणारी/ शिवाय संगणक उत्तमरीत्या हाताळता येणे आवश्यक.

२) इंग्रजी आणि इतर भाषांमध्ये डी.टी.पी. चालक

३) संगीत तज्ञ-तंत्रज्ञान अवगत असणारा

आम्ही योग्य ते वेतन देवू. आमच्या सह प्रार्थना करा, की या सर्व जबाबदाऱ्या करिता देवाने योग्य व्यक्ति पुरावाव्यात.

२०२१ या नवीन वर्षात एको ऑफ हीज कॉलच्या सेवा कार्यात वाढकरण्याच्या प्रकियेत आहोत.

ख्रिसमस आणि नुतनवर्ष जवळ येत आहेत. मुखवाटा ध्यालण्याबाबत दक्षता घ्या. आणि वारंवार हात स्वच्छ धुत राहा आणि दोघांमध्ये सुरक्षित राखण्याची काळजी घ्या. सण साजरा करणे अर्थातच चांगली गोष्ट आहे. "देवाने त्याचा एकुलता एक पुत्र दिला, यासाठी की जो कोणी त्याजवर विश्वास ठेवितो, त्याचा नाश होऊ नये. तर त्याला सार्वकालीक जीवन प्राप्त व्हावे." (योहान ३:१६) तेव्हा तुम्हा सर्वांना ख्रिस्तजन्मदिन आनंदाचा आणि नुतनवर्ष भरभराटीचे जावो अशी शुभेच्छा व्यक्त करीत आहेत.

"परमेश्वर तुझा सततचा मार्गदर्शक होईल, ती अवर्षण समयी तुझ्या जिवास तृप्त करील, तुझ्या हाडांस मजबूत करील, तु भरपूर पाणी दिलेल्या मळ्याप्रमाणे होशील, पाणी कधी न आढणाऱ्या झऱ्याप्रमाणे होशील." (यशमा ५८:११)

नूतन वर्षात देव तुम्हाला आशिर्वाद देवो!

तुमचा दास,
पास्टर सॅम आणि सॅमसन

*(पान १ वरून .....)*

म्हणाली, त्यांनी माझ्या प्रभुला नेले, व त्याला कोठे ठेविले हे मला ठाऊक नाही म्हणून" (योहान २०:१२-१३)

येशु ख्रिस्त प्रेषित योहान यांस पात्म बेटावर तो कैदेत असताना स्वत: प्रगट झाली व त्याला म्हणाला, "मी पहिला व शेवटला आणि सदाजीवी तो मी आहे." जे तूं पाहतोस ते पुस्तकात लिही आणि ते इफिस, स्मृर्ण, दुर्गम थुवतीरा, सार्दीस फिल्देलफिया न लवदिकिया एथील सात मंडळयाकडे पाठीत. "(प्रकटी १:११) त्याच देवाने १९६९ साली कन्याकुमारी या माझ्या गावी मला दर्शन दिले. प्रकटीकरणाचे (१) देवाचे प्रकटीकरण, (२) देवा पासुन चे प्रकटीकरण आणि (३) देवाविषयीचे प्रकटीकरण अशा प्रकारे वर्गीकरण करता येईल.

**१) देवाचे प्रकटीकरण :-**

**एको ऑफ हिज कॉल सेवा** कार्य मासिकाच्या वाचकांच्या वर्गणीद्वारे आणि तुमच्या सारख्या स्वेच्छादान देणाऱ्या प्रियजनांच्या पाठबळावर सुरू आहे. "संतोषाने देणारा देवाला आवडतो." (२करिंथ ९:७) पुर्ण खात्रीने - किंमत देऊन कोणत्याही आणि कशाही मार्गाने सारखे होऊन (१ करिंथ ९:२२)

-संपादक

*(पान ३ वरून .....)*

छोट्या शमुवेलाला देवाचे दर्शन झाले. त्याने इस्त्राएलवर संदेष्टा आणि शास्ता व्हावे अशी त्याची इच्छा होती. तो त्याजशी बोलला आणि त्यामुळे त्याचे ऱ्हदय आणि मन उदीप्त झाले. त्याने जे पहिले त्याच्या पलिकडे पाहावे म्हणून देवाने त्याला दर्शन दिले. तेव्हा लोक त्याला द्रष्टा आणि संदेष्टा म्हणू लागले. तरूण शौल त्याची हरवलेली गाढवे शोधीत असताना त्याला शमुलेलाकडे पाठविले. शमुवेल ५२ वर्षे इस्त्राएलवर संदेष्टा आणि शास्ता साहिला!

येशू ख्रिस्ताला प्रकटीकरण झाले, आणि त्याने शिष्यांना म्हटले, "ज्याने मला पाठविले त्याच्या इच्छेप्रमाणे करावे व त्याचे कार्य सिध्दीस व्हावे हेच माझे अन्न आहे. (योहान ४:३४)" देवाने त्याची इच्छा पूर्णकरण्यासाठी आपल्याला तयार केले आहे. त्याने आपल्याला ती प्रकट केल्याशिवाय आपण ती पूर्ण करू शकणार नाही. आपल्या जीवनात देवाचे प्रकटीकरण आणि त्याची इच्छा यांचे एकत्रीत पणे कार्य झाले पाहिजे.

ज्याप्रमाणे अन्न शरिरासाठी आनंद समाधान आहे आणि शरिराला शक्ति देते. तव्दतच आपल्या प्रकटीकरणाची पूर्तता आपल्या आत्म्याला आनंद देईल. ती आपल्या जीवाकरीता शक्ति आणि मनाला समाधान आहे. येशू ख्रिस्तास देवाने जगात पाठविले. ते त्याचे कार्य करण्याकरीता आणि ते पित्याला समाधान मिळेल. अशा रीतीने पूर्ण करण्याकरिता येशून त्याच्या महायाजकीय प्रार्थनेत म्हटले. "जे काम तू मला करावयास दिले ते समाप्त करून मी पृथ्वीवर तुझे गौरव केले आहे." (योहान १७:४)

आपल्या सर्वांना प्रकटीकरण असलेच पाहिजे. आपण या जगात जन्मास आलो ते आपणांस कळलेच पाहिजे. आपण या एका विशिष्ट कार्य करण्याकरिता पाठविण्यात आलेले आहे आणि आपण स्वत:हून आलेलो नाही. या जगात जर उद्देशा शिवाय लोक येऊ लागले तर जग आजच्या सारखे राहणार नाही. प्रत्येक काळातील लोकांना त्याचा वाटा मिळतो आणि उपदेशासाठी मोशे आणि इतर संदेष्टे मिळतात. (लक १६:२९)

प्रभु परमेश्वरानेच कोणी प्रेषित, कोणी संदेष्टे, कोणी सुवार्तिक, कोणी एक व शिक्षक असे तयार केले. (इफिस ४:११-१२) या सेवकांची उपस्थिती सर्व पिढ्यामध्ये त्याच्या सेवे करिता राहिल. याची देव खात्री करून घेत असतो. याच उद्देशाने की या भूतलावर त्यांची इच्छा करता यावी.

जो पर्यंत आपल्याला देवाचे प्रकटीकरण नाही तो पर्यंत जीवनात काय करावे हे आपण ठरवू शकत नाही. आपले जीवन दिशाहीन असे असेल आणि आपण पूर्णता प्राप्त करू शकणार नाही. आपल्या इच्छुनुसार कार्य करून पूर्णत्व येणार नाही, तर देवाला काय वाटते ते केल्याने प्राप्त करता येते. यासाठी आपल्याला त्याच्या वाचनाद्वारे किंवा प्रत्यक्षात दर्शनाने प्रकटीकरण होण्याची गरज आहे. त्याने/ तिने देवाने आपल्याला समोर येऊन प्रकटीकरण यावे अशी अपेक्षा करू शकत नाही. देव त्याच्या वचनाद्वारे देखील मनन-चिंतन करितो आणि प्रार्थना करितो तेव्हा त्याच्या वचनाद्वारे आपल्याला प्रकटीकरण प्राप्त होते.देवाचे प्रकटीकरण प्राप्त झाल्यावरे आपल्या योग्य ते करण्याकरिता सामर्थ्य प्राप्त होईल. आणि त्या द्वारे आपल्याला ओतोप्रत असा आनंद आणि आशिर्वाद मिळतील. अन्न आपल्याला आधार देते, शक्ति आणि समाधान देते आणि आपण ते गरजवंताना वाटू शकतो.येशू साठी देवाच्या इच्छुनुसार कार्य करणे हेच अन्न होते. आपण त्याच्या इच्छेनुसार कार्य करतो. तेव्हा तो आपल्या गरजा पुरवितो! आपण त्याबद्दल चिंता करू नये.

**२) देवाकडून प्रकटीकरण :-**

यिर्मया संदेष्टयाच्या पुस्तकात देवाचा चिन्तवेधक संदेश आहे.

यिर्मया १:४-१०:-(४) परमेश्वराचे वचन मला प्राप्त झाले ते असे (५) मी तुला गर्भाशयात घडिले त्यापुर्वी तु मला ठाऊक होतास, तू उदरांतुन निघाल्यापुर्वी मी तुला पवित्र केले. मी तुला राष्ट्रांचा संदेष्टा नेमिले आहे. ६) तेव्हा मी म्हणालो, "अहा प्रभु परमेश्वरा, पाहा, मला बोलावयाचे ठाऊक नाही, मी केवळ बाळ आहे." ७) मग परमेश्वर मला म्हणाला : " मी बाळ आहे असे म्हणू नको, ज्या कोणाकडे मी तुला पाठविले, त्याजकडे तु जा व तुला आज्ञापीन ते बोल " ८) त्यांस तु भिऊ नको तुझा बचाव करण्यास मी तुझ्याबरोबर आहे, असे परमेश्वर म्हणतो. ९) तेव्हा परमेश्वराने आपला हात पुढे करून माझ्या मुखास स्पर्श केला, व तो मला म्हणाला पाहा मी आपली वचने तुझ्या मुखात घातली आहेत. १०) पाहा, उपटण्यास व विध्वंस करण्यास नासधूस करण्यास व पाडून टाकण्यास, बांधण्यास व लागवड करण्यास मी तुला आज राष्ट्रावर व राज्यावर नेमिले आहेत.

यिर्मयाकडे देवाचे वचन आले देवाने राष्ट्रांना व राज्यांना संदेश घेऊन जाण्याकरिता तो उदरांत असतानाच त्याला वेगळे केले आहे. व विध्वंस करण्याच्या नासधूस करण्याच्या व पांडून टाकण्याच्या बांधण्याच्याव लागवड करण्याच्या देवाला मान्य नसलेल्या गोष्टी उपटून पाडून टाकून त्यांचा नाश करावयाच्या होत्या व नवीन लागवड करावयाच्या व बांधवयाच्या होत्या. हे यहूदा बद्दलचे विशिष्ट असे प्रकटीकरण होते. राष्ट्र देवाच्या इच्छेपासुन दूर गेले होते. त्यामुळे ते पाडून टाकून उर्वरीत राहिलेल्यांपासुन नवीन राष्ट्र उभे करावयाचे होते.

देवाचे लोक त्यांच्या इच्छेपासुन दूर जातात, तेव्हा तो त्यांना खाली पाडण्यास आणि नाश करण्यास व उभारण्यास हयगय करणार नाही. राष्ट्रांवर ज्या नैसर्गिक आपत्ति अडाखा देतात. त्या आम्हांला हाच धडा शिकवितात. करोना महामारी राष्ट्रावर येते त्याचा अर्थ देवाला राष्ट्राला गाढझोपेतून जागे करावयाचे आणि दुष्ट व देवाला न मानणाऱ्या पासुन शुध्द करावयाचे आहे. नाश करण्यास नाही तर सुधारण्यास व पुर्ववत स्थितीत आणण्यासाठी तेव्हा राष्ट्रानों, भिऊ नको, देव सर्व काही भल्याकरिता करीत असतो. दु:ख वेदना तात्पुरती असतात परंतु पुर्नरचना कायमची असते.

**३) देवा विषयी प्रकटीकरण :-**

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES
SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार

# प्रार्थना विनंत्या

ओझी वाहाणे (गलती ६:२),
गरजा भागविणे (रोम १२:१३),
आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

## १९ डिसेंबर २०२० ते १८ जानेवारी २०२१

**(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)**

### स्तुति करिता मुद्दे :-

| | |
|---|---|
| १९ डिसेंबर :- | परमेश्वराचा आरोग्यदायी हात बंधु पॉलराज,सहसंपादक यांच्याबरोबर आहे. |
| २० डिसेंबर :- | नवीन उर्दु सह संपादक देऊन देवाने आमच्या सेवेस आशिर्वाद दिला आहे. |
| २१ डिसेंबर :- | देवाने आम्हांस आणखीन एका नवीन मणीपुरी भाषेत मासिक प्रसिध्द करणे शक्य होऊ दिले. |
| २२ डिसेंबर :- | देवाने आमच्या सेंट पॉल्स् मॅट्रीक्युलेशन शाळेस नवीन प्रिन्सिपल पुरविले. |
| २३ डिसेंबर :- | एको ऑफ सेवा कार्याच्या गरजा देवाने पुरविल्या, त्याबद्दल त्याची स्तुती करू या. |
| २४ डिसेंबर :- | देवाने या वर्षभरात आम्हांला सुरक्षित ठेविले आहे. |
| २५ डिसेंबर :- | देवाने त्याचा एकुलता एक पुत्र येशू ख्रिस्त यास या जगात तारणारा म्हणून पाठविल्याबद्दल त्याची स्तुती करू या. |
| २६ डिसेंबर :- | आमच्या मुद्रणालयात एकूण १६ भाषांमध्ये छापून मिशन क्षेत्रांत पाठविण्यात येत असलेल्या शुभवर्तमान साहित्यास देव आशीवार्दीत करीत आहे. |
| २७ नोव्हेंबर :- | करोना पीडीतांना आणि आमच्या सेवा कार्याकरिता ज्या प्रियजनांनी मदतीसाठी पुढाकार घेतल्या त्या सर्वाबद्दल देवाची स्तुती करू या. |
| २८ नोव्हेंबर :- | मागील सर्व वर्षामध्ये ज्या सर्वांनी एको ऑफ हीज कॉल सेवा कार्याला आधार दिला त्या सर्वाबद्दल स्तुती करू या. |
| २९ नोव्हेंबर:- | देवाने या संपुर्ण वर्षभरात आमच्या सर्व सहसंपादकांचे रक्षण केले. |
| ३० नोव्हेंबर :- | एको ऑफ हीज कॉलच्या विविध सेवाकार्याबद्दल आणि संपुर्ण टीमबद्दल देवाची स्तुती करू या. |
| ३१ नोव्हेंबर :- | देवाने आपल्या सर्वांना सुरक्षित ठेविल्याबद्दल स्तुती करू या. |
| ०१ जानेवारी :- | मागील सर्व वर्षामध्ये ज्या सर्वांनी प्रार्थनेद्वारे सेवेला आधार दिला त्या सर्वाबद्दल देवाची स्तुती करू या. |
| ०२ जानेवारी :- | सर्व प्रार्थना भागीदार, वर्गणी भागीदार, विश्वासातील भागीदार, आजीवन भागीदार आणि महान सेवाकार्यातील भागीदार या सर्वांकरिता देवाची स्तुती करू या. |
| ०३ जानेवारी :- | देव सर्व दुष्ट शक्तिपासुन आमचे वरिष्ठ पालक पास्टर सॅम सेल्वराज आणि त्यांच्या कुटुंबियांचे रक्षण करीत आहे. |

### प्रार्थने करीती मुद्दे

| | |
|---|---|
| ०४ जानेवारी :- | देवाने या महिन्यातील सेवाकार्याच्या आर्थिक गरजा पुरवाव्यात. |
| ०५ जानेवारी :- | देवाने आमच्या मुख्य मंडळीवर, शाळा, बायबल, कॉलेज, मुद्रणालय, प्रकाशने, कार्यालय आणि त्या मधील सर्व सेवक वर्गायांवरे या नवीन वर्षात नव्याने अभिषेक पाठवावा. |
| ०६ जानेवारी :- | इंग्रजी मासिकाचे सहसंपादक बंधु पॉलराज यांच्या प्रकृति स्वास्थाकरिता प्रार्थना करीत राहू या. |
| ०७ जानेवारी :- | या महामारीच्या काळातील एको ऑफ हिज कॉलच्या सर्व कार्यक्रमांसाठी प्रार्थना करू या. |
| ०८ जानेवारी :- | संपुर्ण जगभरातुन महामारीचे उच्चाटन व्हावे यासाठी प्रार्थना करू या. |
| ०९ जानेवारी :- | आपले सहसंपादक बंधु पॉलराज लिखीत “किंगडम ऑफ गॉड” या पुस्तकाचे तामिळ भाषेत पुस्तक प्रकाशित करण्यास देवाने मदत करावी. यासाठी प्रार्थना करा. |
| १० जानेवारी :- | जगभरातील सर्व ख्रिस्ती मंडळ्यांमध्ये ऐक्य प्रस्थापित व्हावे. |
| ११ जानेवारी :- | ज्या प्रियजनांनी या महामारीमध्ये त्यांचे प्रियजन आणि चीज वस्तु गमावल्या त्यांच्या करिता प्रार्थना करू या. |
| १२ जानेवारी :- | जगातिक शांततेकरिता प्रार्थना करू या. |
| १३ जानेवारी :- | जे देवाचे सेवक तुरुगांतील कैद्यामध्ये सेवा करीत आहे त्यांच्या करिता आणि सेवेकरिता प्रार्थना करू या. |
| १४ जानेवारी :- | आमच्या पत्रव्यवहाराद्वारे करण्यात येणाऱ्या अभ्यास क्रमांसाठी आणि बायबल कॉलेज करिता प्रार्थना करू या. |
| १५ जानेवारी :- | आमच्या वरिष्ट पालकांच्या या वर्षातील सर्व योजना आणि दर्शन पुर्ण व्हावे, या करिता प्रार्थना करू या. |
| १६ जानेवारी :- | उत्तर भारतात सेवा करणाऱ्या मिशनरीच्या सुरक्षिततेकरिता आणि त्यांच्या मार्गदर्शना करिता प्रार्थना करू या. |
| १७ जानेवारी :- | देवाने आमच्या सर्व सहसंपादकांना आणि त्यांच्या कुटुंबियांना आशिर्वाद द्यावा. |
| १८ जानेवारी :- | देवाने आमच्या वरिष्ट पालकांचे आणि त्यांच्या कुटुंबाला सर्व आणि संपुर्ण टीमचे दृष्ट शक्तिपासुन रक्षण करणे सुरू ठेवावे. |

*(पान ४ वरून .....)*

देवाने इस्त्रायल लोकास त्यांचा महान पुरवढा करणारा असे स्वत:स प्रकट केले. सर्व इस्त्राएल लोक मिसर देशाकडे बाहेर निघाले आणि त्यांनी वचनाचा देशे जो कनान देश त्याकडे प्रवासास सुरवात केली. ते तांबड्या समुद्राकडे पुढे पुढे चालले होते. मिसरी सैन्य पळून जात असलेल्या लोकांचा पाठलाग करीत होते. इस्त्राएल लोकांना तांबड्या समुद्राच्या कबरेत जाण्याशिवाय बचावाचाा कोणताच मार्ग नव्हता, लोक मोशे व अहरोन यांनी त्यांच्या या स्थितीबद्दल दोष देत होते. मोशेकडे देखील उपाय नव्हता. तरी देखील त्याला ठाऊक होते की देव त्या लोकांच्या बचावा करिता काहीतरी करणार. आणि मोशे लोकांना म्हणाला, "भिऊ नका, स्थिर उभे रहा आणि परमेश्वर आज तुमचे तारण करील ते पाहा, कारण जे मिरारी लोक तुम्ही आज पाहत आहात ते पुन: कधीही तुमच्या नजरेस पडावयाचे नाहीत. परमेश्वर तुमच्यासाठी लढेल, तुम्ही उभे राहा. (निर्गम १४:१३-१४)

देवाने मोशेला म्हटले, "तुं आपली काठी उभार आणि आपला हात समुद्रावर उगारून तो दुभाग, म्हणजे इस्त्राएल लोक भरसमुद्रात कोरडया भूमीवर चालतील." हा चमत्कार घडला! देवाने तांबडा तांबडा समुद्र दुभागला आणि इस्त्राएल लोक भरसमुद्रात कोरड्या भूमीवरून चालत पैलतिरी गेले! मिसरी सैन्य त्यांचा पाठलाग करीत होते. परंतु सर्व सेना समुद्रात गडप झाली. देवाने इस्त्रायल लोकांस तो काय होतो. हे प्रकट केले.

इस्त्राएल लोक त्यांच्या सोबत घेऊन आलेले अन्न संपले होते आणि त्यांना अन्नाची गरज होती. देवाने (स्वर्गातुन मान्ना वर्षविला) जवळ जवळ दोन लक्ष लोकांना ४० वर्षे त्यांच्या अन्नाची गरज भागविली. त्यांना पाण्याची गरज भासली, तेव्हा देवाने मोशेला सांगितले होरेब गिरीवरील एका खडकावर काठी आपट, त्यातुन पाणी निघेल. लोक पाणी प्याले आणि तहान भागविली. इस्त्राएल लोकांनी तेथे कलह केला म्हणून त्या ठिकाणाचे नाव मरीबा (कलह) असे ठेविले. (निर्गम - १७:१-७)

प्रवास करीत असलेल्या लोकांसमोर जेव्हा यार्देन नदी पैलतीरी जाण्यास अडखळण म्हणून समोर आली, तेव्हा यहोशवाने लोकांस देवाने चमत्कार करावायासाठी स्वत:स शुध्द होण्यास सांगितले. याजक आणि लेवी परमेश्वराचा कोश उचलून सर्व लोकांच्यापुढे चालू लागले आणि जेव्हा त्याचे पाय पाण्याला लागले, तेव्हा पाणी वाहण्याचे थांबले आणि इस्त्राएल लोक भरसमुद्रातुन कोरडया जमिनीवरून चालत पलीकडे गेले.

देव त्यांच्या सामर्थ्यशाली हातांद्वारे इस्त्राएल लोकांस प्रकट झाला. देव प्रकटी करण देतो ! आपला देव व चमत्कार करणारा देव आहे.

"पूर्वीच्या गोष्टींची आठवण करू नकाऽ, जुन्या गोष्टी मनात आणू नका. पाहा मी एक नवीन गोष्ट करणार आहे."आताच तो उद्भवत आहे, तुम्ही ती पाहणार नाही काय? मी अरण्यात सडक करीन, मरूभूमीत नद्या वाहवीन. (यशया ४३:१८-१९)

सृष्टीचा निर्माण कर्ता आपला देव हा चमत्कार करणारा देव आहे. तो शमुवेलास, कबरेजवळ रडत उभी असलेल्या मरिया मग्दालीयेला, पात्मबेटावर प्रोषित्व योहान यांना प्रकटीकरण केले. यिर्मया संदेषठ्याला त्याच्या कामाकरिता देवाकडून प्रकटीकरण प्राप्त झाले. वचनाच्या कनान देशाकडे कूच करीत असलेल्या इस्त्राएल लोकांना स्वत:विषयी प्रकटीकरण केले. पवित्र बायबल हे

**१) देवाच्या प्रकटीकरणाच्या**
**२) देवाद्वारे केलेल्या प्रकटीकरणाच्या**
**३) देवा बद्दलच्या प्रकटीकरणाच्या**

गोष्टींना भरलेले आहे. सामर्थ्यशाली देव करो आणि तुम्ही पवित्र कनानाकडे कच करीत असताना तुम्हाला तो स्वत: प्रकटीकरण देवो.

# देव मनुष्याकडून काय अपेक्षितो?

रेव्ह पी. नेथनाआगमनी)

**" हे मनुष्या, बरे काय ते त्याने तुला दाखविले आहे., नितिने वागतो. आवडीने दया करणे, व आपल्या देवासमागमें राहून नम्रभावाने चालणे यावाचून परमेश्वर तुजजवळ काय मागतो?" (मीरवा ६:८)**

मनुष्याची निर्मिती, त्याने देवाच्या अगदी जवळच्या नाते संबंधात असावे यासाठी केली गेली. निर्मिती मागचे हे प्रमुख कारण आहे. असे नाते अस्तित्वात असल्याकरिता, देव मनुष्याकडून का मागतो? हि चौकशी केवळ नैसर्गिकच नाही. तर आवश्यक देखील आहे. या चौकशीचे उत्तर बायबल मध्ये समाविष्ट आहे. ज्याद्वारे मनुष्यांबद्दलची त्याची इच्छा आणि त्यासोबतच त्याची पध्दत कळते. वचनातुन देवाची आदर्श आणि वास्तविक आवश्यकता (मागणी) जाहीर करीत आहे.

देवामध्ये आदर्श आणि वास्तविकता दोन्ही एक सारखेच आहेत. तो जसा असावा तसाच आहे. परंतु मनुष्यामध्ये ते एक सारखे नाही. एक मनुष्य जो स्वत:ला पवित्र समजतो, त्याची येशूशी समोरासमोर गांठ पडते. त्यावेळेस तो कबूली देतो, किती मी अधम माणुस." मानवी इतिहासात एकट्या येशूनेच देवाच्या आदर्श आणि वास्तविक मागण्या त्याच्या अनुभवात एकत्र केल्या.

**मानवी अनुभवात वास्तविकता आणि आदर्श एकसारखे नसतात. मी आपल्या चौकशीचे दोन भागात उत्तर देवू इच्छितो.**

अनुवादाच्या पुस्तकात सांगण्यात आले आहे. मनुष्याने व्याजवर प्रिती करावी, त्याची सेवा करावी आणि त्याच्या व्यवस्थेचे पालन करावे. असे देव मनुष्याकडे मागतो. " तु आपला देव परमेश्वर याजवर प्रिती करावी. आणि त्याने तुला लावुन दिलेली व्यवस्था, त्याचे विधी त्याचे नियम व त्याच्या आज्ञा ही नित्य पाळावी." (अनुवाद

११:१)

मीखा ६:८ या वचनात म्हणतो, नीतीने वागतो आवडीने दया. करणे व आपल्या देवासमागमें राहून नम्रभावाने चालणे यावाचून परमेश्वर तुजजवळ काय मागतो? अशा प्रकारच्या सर्व घोषणामध्ये "काय मागतो" असा शब्द भाषांतरांत वापरण्यास आलेला आहे.

इब्री भाषेतील या शब्दाचा अर्थ " देवाला हेच अपेक्षित आहे" किंवा हवे आहे असा आहे. दुसऱ्या शब्दात "देव हेचे मागत आहे." परंतु मीखा त्यावर अधीक जोर देत आहे. "देव याबद्दल आग्रही आहे." ज्या वेळेस नियम देण्यात आले त्यात देवाला काय हवे आहे. त्याची घोषणा साध्या सोप्या शब्दात करण्यात आली होती. परंतु नियमांचे उल्लंघन करण्यात आल्यामुळे मीखा सांगत आहे. मनुष्याने नीतीने वागावे, आवडीने दया करावी, देवासमागमे राहून नम्रभावाने चालावे.

या मुद्याला अधिक स्पष्ट करण्याकरिता येशूने दुसऱ्या एका ठिकाणी म्हटले, "यास्तव जसा तुमचा स्वर्गीय पिता पूर्ण आहे, तसे तुम्ही पूर्ण व्हा" (मन्तय ५: ४८) पूर्ण या शब्दाचा काय अर्थ आहे.

तो पापाच्या अगदी उलट किंवा विरूध्द असा आहे. नव्या करारात पापाचा संदर्भ नेम चुकणे असा आहे. पूर्ण ची मुळ कल्पना निशाणावर अचूक मारा करणे. पुर्ण व्हा. याचा अर्थ तुम्ही निशाणा चुकवू नये तर तो गाठावा. किंवा अचूक मारा करावा. देवाला हवे आहे तसे तुम्ही व्हावे.

मला नव्या करारात येशूने त्याची परीक्षा पाहण्याकरीता शास्त्र्याने विचारलेल्या प्रश्नाच्या उत्तरात देवाच्या अपेक्षा पहावयास मिळतात. "तू आपला देव परमेश्वर याजवर पूर्व अंतकरणाने, पूर्ण जिवाने व पूर्ण मनाने प्रिती कर, हीच मोठी व पहिली आज्ञा आहे. हीच्यासारखी दुसरी एक ही आहे की "तू आपल्या शेजाऱ्यावर आपणासारखी प्रिती कर" या दोन आज्ञांवर सर्व नियमशास्त्र व संदिष्टशास्त्र ही अवलंबून आहेत. (मत्तय २२ :३७-४०) मोशे आणि मीखा यांनी जे सांगितले ते "तू आपला देव परमेश्वर याजवर प्रिती करावी...." तू आपल्या शेजाऱ्यावर आपणासारखी प्रिती करावी. ते सर्व यामध्ये समाविष्ट आहे.

या मागण्यांचे प्रकटीकरण काय आहे? देवाला प्रत्येक मनुष्यांकडून पूर्णता आणि आदर्शाची सत्यता किंवा जाणीव हवी आहे. ही देवाची पहिली मागणी किंवा अपेक्षा आहे. देवाची इच्छा आहे की, ज्यासाठी त्याने मला निर्माण केले ते मी असावे आणि हीच पूर्णता.

आपण देवदूत व्हावे अशी देवाची अपेक्षा नाही, कारण त्याने आपल्याला दूतांचा स्वभाव दिलेला नाही. मनुष्याने मनुष्यच असावे आणि स्त्रीने असते अशी अपेक्षा करतो.बालकाने बालकच असावे अशी त्याची अपेक्षा आहे. बालकाने जर त्याचा बालीशपणा सोडला तर त्याला बालक म्हणता येणार नाही. देव त्याच्या निर्मितीने त्याच्या परिपूर्ण इच्छे पर्यंत पोहचावे असे अपेक्षितो.

मानव जातीत सर्व सामान्यपणे पुर्णत्वाची भावना असते. कोणत्याही प्रकारात का होईना ज्याला पूर्णतेची भावना नाही असा मनुष्य सापडणे कठीण आहे. केवळ एक ख्रिस्ती व्यक्तिच परिपुर्ण होणे किंवा परिपुर्णता गाठणे शक्य नाही. असा विचार करते. आपण काय व्हावे किंवा काय होणार या विषयीचे स्वप्न न पाहिलेला तरूण किंवा पाहिलेली तरूणी तुमच्या कधी तरी पाहण्यात आली आहे का? कदाचीत तुम्ही त्यांना तुच्छेतेने हसला असाल आणि अडखळविले असेल. त्यांच्या हृदयात कदाचीत ध्येय गाठण्याची तीव्र इच्छा असेल. पनतेची तीव्र इच्छा ही पुर्णतेच्या शक्यतेची अनुमान आहे. देवाला हवे आहे, आणि तो आग्रह धरीतो की मनुष्याने त्याज सोबत चालावे, नीतीने वागावे आणि आवडीने दया करावी, मनुष्यांनी त्यांच्या जीवनाची जाणीव व्हावी आणि त्यांना ती त्याजबरोबर एकोप्याने राहून व्हावी. आदर्श मागणी जी ती हीच.

देवाच्या आदर्शाच्या मागणीची जाणीव आपल्याला पापाची खात्री होण्याकडे पुढे नेते कारण आपल्याला कळते की आपण दैवी दर्जाच्या परिपुर्णतेला उणे आहोत. ज्या व्यक्तिला आदर्श स्थान समजते. त्याला तो कोठे चुकला हे देखील कळते. ज्या वेळेस पंतय बिलाताने यहुदी याजकांच्या डोळयात डोळे घालून त्यांना म्हटले. "मी जे लिहिले ते लिहले," कदाचित त्याचे वाक्य उध्दपणाचे वाटले. परंतु त्यांत त्याला वाटले असेल. त्यापेक्षा खोल अर्थ होता. त्याचा अर्थ मी जे काही केले ते कोणतीही किंमत देऊन बदलता येणार नाही. भूतकाळातील अपयश बदलता येत नाही.

जगाच्या दर्जाप्रमाणे काही निर्दोष दिसतील. परंतु जेव्हा व्यक्ति परिपुर्णतेच्या दर्जाशी, जो देवाने तयार केला आहे. स्वत:ची तुलना करिते तेव्हा त्या व्यक्तिला तीच्या जीवनातील वेगवेगळी उणीवता दिसुन येते.

**देवाची वास्तविक (खरी) अपेक्षा :-**

मज पापी व्यक्तिकडून देव काय अपेक्षा करीत आहे? देवाने (येशुने) त्याच्या बहुमुल्य अर्पणाद्वारे आणि त्याच्या पुनरूत्यानाच्या विजयाद्वारे प्राप्त झालेल्या अधिकाराद्वारे पापाची क्षमा पुरविली आहे. त्या प्रकाशात देव आपल्याकडून काय मागत आहे.येशूने त्याची परीक्षा घेऊ पाहणाऱ्या त्याच्याच वयाच्या मनुष्यास म्हटले. "देवाचे काम हेच आहे की, ज्याने त्यास पाठविले त्याजवर तुम्ही विश्वास ठेवावा." (योहान ६:२९) काही जणांचे म्हणणे आहे, की कर्मांने त्यांचे तारण झाले. इतर काही जण म्हणतात. काही करण्याची गरज नाही. केवळ विश्वास ठेवा."येशू म्हणतो" हे देवाचे काम आहे. ज्याला त्याने पाठविले त्याजवर तुम्ही विश्वास ठेवावा. कोणा बरोबर आहे? ते किंवा ख्रिस्त? ख्रिस्त बरोबर असणार. ख्रिस्ताच्या म्हणण्याचा अर्थ असा होता की, तो केवळ राजाच नव्हता तर उध्दारक तारणारा देखील. त्यांच्या अपयशाच्या सत्यतेची जाणीव आल्यावर त्याचे पाप कळल्यावर येशूने म्हटले. "त्यांनी त्याजवर विश्वास ठेविला तर ते देवाचे कार्य करू शकतील." देवाने येशूमध्ये त्यांची शुध्दतेची नव्या जन्माची, आणि देव इच्छित असलेले कार्य करण्याच्या ताकदीची सोय करून ठेविली होती. त्यामुळे प्रथमत: जबाबदारी ही येते की मनुष्याने त्याजवर विश्वास ठेवावा.

त्याजवर विश्वास ठेवणे म्हणजे त्याचा दावा ऐकणे, आणि तो खरा आहे हे समजून त्याचे पालन करणे. पाप केलेल्या आणि चुकलेल्या

*(पान ७ वरून .....)*

मनुष्याकडून हे मागत आहे. अपेक्षित आहे. देवा आपणाकडून अपेक्षा करतो की, पाठविले त्याजवर विश्वास ठेवावा, स्वत:स ख्रिस्ताच्या ताब्यात देऊन टाकावे.

या अटीचे प्रकटीकरण असे आहे की, सर्व मनुष्यांना जी पुर्वस्थितीत येण्याची गरज आहे. ती ख्रिस्त येशू मध्ये पुरविलेली आहे. देव मनुष्याकडून हेच मागतो. देवाने जे देऊ केलेले आहे ते त्याने घ्यावे. "तो स्वकीयांकडे आला तरी त्याच्या स्वकीयांनी त्याचा स्वीकार केला नाही. जितक्यांनी त्यांचा स्विकार केला तितक्यांस, म्हणजे त्याच्या नामावर विश्वास ठेवण्यांस, त्याने देवाची मुले होण्याचा अधिकार दिला. त्यांचा जन्म रक्त, अगर देहाची इच्छा, अगर मनुष्यांची इच्छा यापासुन झाला नाही, तर देवापासुन झाला." (योहान १:११-१३)

या वचनांमध्ये योहान दोन अटी वापरत आहे. "स्विकार आणि विश्वास" आणि ते समानार्थी शब्द आहेत असे दाखवितो. जे त्याचा स्विकार करितात ते त्याच्या नामावर विश्वास ठेवणारे आहेत. येशूवर विश्वास ठेवणे. त्याचा स्विकार करणे होय.

देव ख्रिस्तामध्ये मला माझ्या पापांची क्षमा आणि जाऊन पुन:पाप न करण्याचे सामर्थ्य पुरवितो. आता तो मजपासुन काय अपक्षित आहे? तो हेच अपिक्षित आहे, की तो जे पुरवित आहे ते मी घ्यावे, आणि ज्याला तो प्रदर्शित करतो त्याला राजा म्हणून मुकुट घालावा. ज्या तारण्याला तो पाठवित आहे. त्याजवर विश्वास ठेवून मजसमोर ठेविलेले अनंतकालीन जीवन स्विकारावे पापी व्यक्ति करिता ती पहिली आवश्यकता आहे. देव जो सर्व बाबतीत पुरेसा आहे. असा तारणारा देव आहे. नमुना प्रकट करून शक्ति पुरवुन सर्वत्र असलेल्या सर्वांनी पश्चाताप करावा व त्याने पाठविलेल्या पुत्रावर विश्वास ठेवावा.

वास्तविक किंवा खरी आवश्यकता दुसरी काही नसुन वास्तविकतेची जाणीव होणे ही आहे. देवाने आपल्यासाठी आदर्श अशी आवश्यकता कधीही थांबविली नाही. तो आपल्या जीवनात परिपुर्णतेशिवाय कमी अशा कशालाही मान्यता देणार नाही. देवाने जे कोणी त्याच्या दर्जात कमी भरले आहेत. त्यांना स्वर्गात घेण्याकरिता दु:ख सहन केले नाही. मनुष्याने येशूवर परिपूर्णते: पर्यंत पोहचावे पूर्णता गाठावी ही देवी योजना आहे.

"तुम्हांस पतनापासुन राखण्यास आणि आपल्या ऐश्वर्ययुक्त सानिध्यांत निर्दोष असे उल्लासयुक्त उभे करण्यास जो समर्थ आहे." (यहुदा १:२४) हे वचन आपणांस सांगत आहे. की देव पुर्णतेपेक्षा कमी असे काही स्विकारत नाही. आपण जेव्हा संपुर्णपणे स्वत:स उध्दारकाच्या हातात देतो. तेव्हा तो आपल्या नकारार्थी गोष्टी उणेपणा आणि आपल्या अपयशाच्या जागा ठीक करतो, ज्याद्वारे आपण पूर्णता प्राप्त करू शकतो.

आपल्या ख्रिस्ताला केलेल्या पहिल्याच अधीनतेत परिपुर्ण असा आदर्श एकदम जाणवत नाही. तार्ससकर शौलाला जो जीवनाचा आणि प्रीतिचा प्रभु त्याने दमारकराच्या मार्गावर त्याला दर्शन दिले. पौल ज्याने ३० वर्षे भक्तिमय जीवन जगला आणि स्वत: करिता महान अशा गोष्टी प्राप्त करून घेतला तो फिलीप्पैच्या मंडळीला लिहित असताना म्हणतो. "मी इतक्यात मिळविले, किंवा इतक्यात मी पुर्ण झालो असे म्हणत नाही. तर ज्यासाठी ख्रिस्त येशूने मला आपल्या कहयांत घेतले. ते मी आपल्या कहयात घ्यावे म्हणून मी त्याच्या पाठीस लागत आहे. (फिलिपो ३:१२)" तीस वर्षाचा ख्रिस्ती जीवनाचा आणि कार्याचा, अनुभव तसेच अग्नी, नग्नता संकटे, तरवार या सर्वातुन जावून देखील अजून पूर्णतेपर्यंत पोहचला नाही.

माझ्या प्रियानो, मला तुम्हाला हे लक्षात राहू देवू इच्छित आहे की, पुर्ण आदर्श एकदम कळून येत नाही. परंतु ती जाणीव होण्यासाठी लागणारा जोर तो एकदम स्विकारता येतो. पौल म्हणतो तो पूर्णतेप्रत पोहंचला नाही. तो त्याच पत्रात म्हणतो.

"जगणे हे मला ख्रिस्त आहे." मागील गोष्टीकडे दुर्लक्ष करून व पुढील गोष्टींकडे लक्ष लावून ख्रिस्त येशूमध्ये देवाने जो वरील पाचारण त्यासंबंधीचा पण जिकण्यासाठी मर्यादेवरील खुणेकडे धावतो हेच एक माझे काम आहे." (फिलिपो ३:१३-१४) या वचनाद्वारे तो असे म्हणत आहे, मंडळीच्या सेवेकरीता त्याने जो उत्साह कळकळा, उस्तुकता पणाला लावली ती आता जो पूर्णतेच्या प्राप्तिकरीता लावीत आहे.

आपण जे हा संदेश वाचत आहात तो माझ्या वयापेक्षाही अधिक काळापासुन ख्रिस्ती असाल, कदाचीत प्रभुकरिता मजपेक्षाही अधीक प्रामाणिक असाल. ते तुम्ही मला निश्चितपणे सांगाल की तुम्ही अद्याप पुर्णतेप्रत पोहचलेला नाही.ज्यांनी दृष्टीच ख्रिस्ती जीवनास सुरवात केलेली आहे. त्यांना देखील मी लिहलेले आहे. कृपया हे लक्षात असू द्या की तुमच्या अंतिम पुर्णते करिता आवश्यक आहे. ते सर्व तुमच्याकडे आहे, कारण ख्रिस्ताचा स्विकार केल्यामुळे तो त्यांच्या सर्व पुर्णतेमध्ये त्याच्या सर्व अधिकारात तुमच्या मध्ये आहे आणि शेवटी त्याचे काम पुर्ण होईल तुम्ही त्याजसारखे व्हाल आणि देवासमोर तुम्हाला सादर करण्यात येईल. या सर्वाशिवाय पुर्णता शक्य नाही. या सर्वासहित पुर्णतेचे आश्वासन खात्री आहे.

पुर्णतेचा साक्षात्कार होण्याकरिता असलेली प्राथमिक आणि चिरस्थायी अवस्था थोडक्यात अशी आहे. असे म्हणता येईल.ख्रिस्तावर विश्वास ठेवणे ही कृति नसून स्वभाववृत्ति आहे. ते मी ख्रिस्ताचा ४० वर्षापुर्वी स्विकार केला असे म्हणणे नाही. म्हत्वाचे हे आहे, की आता तुम्ही त्याजवर विश्वास ठेवीत आहात का? मी तुमच्या पुर्वीच्या अनुभवास कमी लेखीत नाही. विश्वास ठेवणे ही स्वभाववृत्ति आहे.

त्याजवर त्यावर विश्वास ठेवू या, पापाविमोचनाकरिता, शक्तिकरिता त्याजवर भरोसा करू या. सर्व त्यागुन त्याच्या मुखाकडे पाहात राहू या यासाठी की देवाच्या ख्रिस्ताने आपल्याशी संबंधीत ते पुर्ण करावे. त्याजवर विश्वास ठेवून आपण त्याची पहिली आवश्यकता पुरी करावी. प्रभु करो आणि आपण सर्वांना त्याची अंतीम आवश्यकता पुरी करणे शक्य होऊ देवो.



# PIT TO PALACE

# खड्यातून महालापर्यंतची मालिका

## (रेव्ह. सॅम सेल्वा राज यांच्या जीवनांतील अनुभव)

**"जो कोणी बुध्दिमान् असेल त्याने ह्या गोष्टींकडे लक्ष पुरवावे" (स्तोत्र १०७:४३(अ))**

## "मी तर दीन व दरिद्री आहे, तरी प्रभुला माझी चिंता आहे"....

स्तोत्र ४०: १७(अ)

सेहचाळीस वर्षापुर्वी चेन्नईमध्ये एक संजीवनाची सभा घेतली गेली होती. दक्षिण आफ्रिकेतुन कोणीतरी प्रसिध्द उपदेशक आले होते. देवाने त्यांच्याद्वारे अभ्दूत कृत्ये घडवून आणली. फार मोठ्या संख्येतील लोकांनी त्यांच्या जीवनात अगदी पहिल्यांदाच चमत्कार घडताना पाहिले, आणि येशू ख्रिस्ताच्या सुवार्तेचा संदेश ऐकला. मी त्यांना एक स्वयंसेवक म्हणून मदत करीत होतो.

सभांच्या समाप्तीनंतर विशेष आमंत्रित आणि स्वयंसेवकांसाठी एक संमेलन आयोजित करण्यात आले होते. अचानक दक्षिण आफ्रिकेतील त्या पाहुण्यापैकी प्रमुख पाहुण्याने मला पुढे बोलविले, माझ्याबद्दल चौकशी केली, आणि प्रामाणिकपणे सभांच्या जाहीरातीचे फलक निरनिराळ्या ठिकाणी लावल्याबद्दल व सभांमध्ये सहभागी झालेल्या सर्वांना सहकार्य केल्याबद्दल माझे कौतुक देखील केले.

मी कोठे राहतो असे विचारले आणि मला विनंती केली की मला विमानतळावर निरोप देण्यास पहाटे ४ वाजता उपस्थित राहता येणे शक्य आहे का? मी त्यांना उत्तर दिले की, मला तसे शक्य होणार नाही, कारण विमानतळ माझ्या घरापासुन २५ कि.मी. अंतरावर आहे. आणि इतक्या पहाटे तेथे पोहचण्यास माझ्याकडे सायकलीशिवाय दुसरे वाहन नाही.

तात्काळ त्यांनी सभोवताली नजर फिरविली आणि त्यांना शहरातील एक प्रसिध्द सुवार्तिक दिसले. त्यांनी त्यांना नावाने हाक मारून जवळ बोलावले व माझी ओळख करून दिली. माझ्या विषयी कौतुकाचे शब्द उच्चारले व त्यांना म्हटले. "मला या तरूणामध्ये काहीतरी विशेष असे दिसते, आणि माझी इच्छा आहे की मी भारत सोडण्या अगोदर त्यांच्या सोबत विमानतळावर थोडावेळ घालवावा इच्छितो. तेव्हा माझी इच्छा आहे की, तुम्ही मला निरोप देण्यास येणारच आहात, तर तुमच्या मोटारीतुन त्याला सोबत घेऊन या, कारण तो गरीब आहे आणि विमानतळावर दूरवर येण्यासाठी त्यांच्याकडे वाहन नाही." परंतु त्या सुवार्तिक बंधुने मजकडे रागाने पाहिले व त्या प्रमुख पाहुण्यांना उत्तर दिले. "या मनुष्याला विमानतळावर सोबत घेऊन येण्यासाठी माझ्या मोटारीत जागा नाही. त्यावर त्या पाहुण्याने सुवार्तिक बंधुला विचारले, तुमच्या सोबत मोटारीतुन आणखीन कोणी, येणार आहेत का?" त्यावर त्यांनी उत्तर दिले, नाही! कोणीही नाही, तरी देखील मला या व्यक्तिस मदत करिता येणार नाही.

त्या पाहुण्या प्रमुख वक्त्यांना ते ऐकून धक्काच बसला. त्यांनी मला बाजुला घेऊन माझ्या डोक्यावर हात ठेवून अश्रुपुर्ण नयनांनी मजसाठी प्रार्थना केली आणि मला भौतिक आशिर्वाद देखील द्यावेत असे मागितले. त्यानंतर त्यांनी मला म्हटले,"माझ्या बंधु सॅम, मला कळले आहे की तूं मी आज ज्या देवाची सेवा करीत आहे. त्याच देवाचा तू नम्रसेवक आहेस." मी तुजवर आणि तुझ्या सेवाकार्यावर भरभराट उत्कर्ष इच्छितो. ज्या देवाचा मी सेवक आहे, तो स्वर्गातुन तुजवर आशिर्वादाची वृष्टी करून तुला अनेक मोटारी आणि भारतात सेवेकरिता आवश्यक असलेल्या इमारती तुला देईल. तुं त्या बंधुचा जो तुला उद्या विमानतळावर घेऊन येण्यास नकार देत आहे.द्वेष करू नये.

या अनुभवान मी दु:खीत झालो नाही, मला वेदना झाल्या नाहीत, परंतु मी देवाचे, त्याच्या सेवकाच्या आशिर्वादीत शब्दांबद्दल आभार मानिले. दिवस सरले. परंतु देव विश्वासू होता तो मला विसरला नाही. कालांतराने देवाने मला सेवेकरिता वाहने आणि सेवेकरिता उपयुक्त सर्व साहित्य पुरविले. ज्या विमानतळावर मी त्या दिवशी जाऊ शकलो नाही, त्याच विमानतळावर देवाने मला माझ्या वाहनातुन माझ्या सहकाऱ्यासोबत अनेकदा जाणे शक्य होऊ दिले. आपल्याला किती अभ्दुत असा देव लाभला आहे. तोच देव आज देखील जीवीत आहे. तो काळ, आज आणि सर्वकाळ सारखाच आहे.

प्रिय वाचक हो, तुम्हाला कोणी मान्यता देत नाही म्हणून तुम्ही अस्वस्थ आहा का? आजची हलाखीची परिस्थिती पाहून तुम्ही निराश आहात का? तुमच्या जवळचे लोक तुम्हांला कमी लेखीले आहेत का? देव तुम्हांला म्हणत आहे, " तुमचे अंत:करण अस्वस्थ होऊ नये.....

मी तुम्हांस अनाथ असे सोडणार नाही. तुम्हांकडे येईल (यौहान १४:१,१८) ख्रिस्त केंद्रित असे जीवन जगा, देव तुम्हांला आशिर्वाद देवो!

---

**पाहिजेत**

- चीफ एक्सीकटीव्हचा इंग्रजीतुन पत्रव्यवहार हाताळण्या करिता आणि व्यवस्थापन पाहण्याकरिता सेक्रटरीज पाहिजेत. (पात्रता :- पदवीधर)
- इंग्रजी व इतर भाषेत स्वतंत्ररित्या पत्रव्यवहार करू शकणारा/शकणारी उत्तम रित्या संगणक हाताळता येणे आवश्यक.
- इंग्रजी आणि इतर भाषांतील डी.टी.पी. चालक
- संगीत तज्ञ - तंत्रज्ञान अवगत असणारा.

संपादक

RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/18-20 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/18-20

# ECHO OF HIS CALL

**Monthly magazines in 16 languages, Bible Colleges, Postal Courses, Church Planting, Village English High School, Gospel Printing Press, Crusades, Seminars, Social Services, etc.**

**Annual Subscription : Rs. 100/- Life Subscription : Rs. 2000/-**

The multifarious activities of **Echo of His Call Ministry** is supported by the free-will offerings and donations of the God's Children like you. You may support **Echo of His Call** and its activities as the Lord leads you. We need your help to send forth the Gospel to the unreached people and plant Churches.

If you would like to receive **ECHO OF HIS CALL** magazines regularly, please write to us. Whenever you change your postal or e-mail addresses, please do inform us your old and new addresses.

**Echo of His Call** is available in 16 languages in our websites also. You can read it by going into the site as well as downloading it and get blessed.

Your letters, prayer requests and your financial helps (by D.D., Cheque, M.O. etc.) to **ECHO OF HIS CALL** may be sent to the address below.

Please send your **Land Phone / Mobile Phone Numbers and E.mail addresses** for updation.

**ECHO OF HIS CALL**
10, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk,
Chennai - 600 005, India
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766,
Cell: (+91) 98410 71852, 95661 31858
E-mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.echoofhiscall.com

**YOU CAN SEND YOUR DONATIONS ON ONLINE ALSO**

## PLEASE PRAY FOR OUR MINISTRIES AT THE HEADQUARTERS

1. Prayer Service : 24 hours
2. **BIBLECOR -** Bible Correspondence Courses : English, Tamil & Hindi
3. **ECHO OF HIS CALL** - Monthly Magazines : English, Tamil, Malayalam, Telugu, Hindi, Kannada, Marathi, Gujarati, Bengali, Odiya, Nepali, Assamese, Punjabi, Urdu, Sinhala & Afrikaans.
4. Nehemiah Bible Colleges (Two Centres)
5. Theological Correspondence Courses: English & Tamil
6. Great Commission Partners (Network of Pastors)
7. Training Programmes
8. Crusades
9. Literature Distribution and Follow Up
10. Gospel Printing Press - Publications
11. St. Paul's Matriculation School - Village English High School
12. Sunday Schools : 8.30 a.m. & 4.00 p.m. Sunday
13. **Tamil Services : 5.30 a.m. , 7.00 a.m. & 10.00 a.m. Sunday**
14. **Malayalam Service : 2.00 p.m. Sunday**
15. **Telugu Service : 4.00 p.m. Sunday**
16. **Hindi Service : 5.00 p.m. Sunday**
17. **English & Tamil Service : 6.00 p.m. Sunday**
18. Pastors' Counselling : 4.00 p.m. Sunday
19. Women's Prayer : 5.30 p.m. Wednesday
20. Mid-week Bible study : 6.30 p.m. Wednesday
21. Men's Prayer : 7.00 p.m. Friday
22. Workers' Meeting : 6.00 p.m. Saturday
23. House Meetings : 6.30 p.m. Monday & Tuesday
24. Special Holy Communion : 5.30 a.m. 1st day of each month
25. Ministers Review Meeting : 5.30 p.m. First Saturday
26. Parents' Prayer : 4.00 p.m. First Sunday
27. Night Prayer : 9.30 p.m. Second Friday
28. Fasting Prayer : 9:30 a.m. Third Saturday
29. Holy Communion : Second Sunday Services
30. Morning Devotion : 5.30 a.m. daily
31. Staff Devotion : 9.00 a.m. daily
32. Office : 9.00 a.m. to 9.00 p.m. (except Sundays)

**The details of our Bank Accounts are given below. Please inform us the details of your remittances.**

| Bank | Branch | Name | IFSC Code No. | Account Number |
|---|---|---|---|---|
| 1. STATE BANK OF INDIA | Triplicane, Chennai -5 | S. Sam Selva Raj | SBIN 0000249 | 102329 34679 |
| 2. ICICI BANK | Anna Salai, Chennai -2 | Echo of His Call | ICIC 0006038 | 6038 05022319 |

RNI NO. 70106/98
Postal Regn. No. TN/CH/(C)/206/18-20
WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/18-20
Date of Publication: Second week of every month
Date of Posting : 11th & 12th of every month
Posted at "Egmore RMS / 1 Patrika Channel"
on 12th DECEMBER 2020
If un-delivered please return to:
ECHO OF HIS CALL (MARATHI)
P.O. Box No. 2957,
Chepauk, Chennai - 600 005, INDIA.
Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766

***JESUS LOVES YOU!***

To

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from No.18, Mohammed Abdullah Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by him at **Echo of His Call Printers** No. 18, Mohammed Abdullah Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**